चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे बांधकाम करण्यासाठी निधी वितरणास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः चंसैशा-२०१७/प्र.क्र.७९/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
तारीख : १६ जानेवारी, २०१८

<u>वाचा</u> - १) शासन निर्णय क्र. इसैशा-२०१७/प्र.क्र.९६/एसएम-६, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक १३.४.२०१७
२) शासन परिपत्रक क्रमांकः पूरक २०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, दिनांक ३०.६.२०१७
३) शासन निर्णय क्रमांक: अनुवि-४९१७/प्र.क्र.३२/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २.८.२०१७
४) शिक्षणाधिकारी, जि.प., शिक्षण/माध्य/सैशाबां निधी/३४१५/२०१७, दिनांक २६.९.२०१७
५) शासन निर्णय क्रमांकः चंसैशा-२०१७/प्र.क्र.७९/एसएम-६, दिनांक १०.११.२०१७

<u>शासन निर्णय</u>:-

चंद्रपूर सैनिकी शाळेच्या परिसराला संरक्षण भिंत, व अंतर्गत रस्ते बांधकामासाठी रु. १२३६.७७ लक्ष इतक्या किंमतीच्या खर्चास संदर्भाधीन क्र.(१) अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. या बांधकामाच्या अंदाजपत्रकापैकी रू. ५.०० कोटी (रुपये पाच कोटी फक्त) इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यास व खर्च करण्यास संदर्भाधीन क्रमांक (५) येथील शासन निर्णयान्वये शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. सदर खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात “मागणी क्रमांक ई-४, ४२०२-शिक्षण,क्रीडा, कला संस्कृती यावरील भांडवली खर्च, ०१ सर्वसाधारण शिक्षण, २०२-माध्यमिक शिक्षण, (०१)- सैनिकी शाळेचे बांधकाम, (०१)(०१) चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे बांधकाम, (४२०२ ६४३३), ५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षातून खर्ची टाकण्यात आला आहे. सदर निधी वितरीत करण्यासाठी संदर्भाधीन क्र. (५) अन्वये आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व सहाय्यक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांना संवितरण व आहरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

३. सैनिक शाळेचे बांधकाम चंद्रपूर येथे होत असल्याने प्रशासकीय कारणास्तव सहाय्यक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांच्याऐवजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना या आदेशाद्वारे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०११६१६२८३८०३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2018.01.16 16:34:32 +05'30'

(संगिता शेळके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४) जिल्हाधिकारी,चंद्रपूर
५) मुख्य कार्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
७) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर
८) उप सचिव (अर्थसंकल्प),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई.
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर.

प्रत माहितीसाठी:-

१) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई-३२
२) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई-३२
४) उप सचिव (शाळा व्यवस्थापन),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई-३२
५) निवड नस्ती (एस एम-६).